स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्यविज्ञानविद्याशाखे
अंतर्गत ‘इतिहास’ विषयातील पीएच्.डी. (विद्यावाचस्पती)
पदवीसाठी सादर करावयाचा संशोधनपूर्व आराखडा

“डॉ.अनिल कठारे यांचे इतिहास लेखनातील योगदान: एक चिकित्सक अभ्यास”

संशोधक

श्री पुरी दत्ता भाऊसाहेब

एम.ए., इतिहास

मार्गदर्शक

प्रा. डॉ. संजय भाऊराव गिरे

एम.ए., बी.एड्., एम.फिल., पीएच.डी.
इतिहास विभाग प्रमुख, पदवी व पदव्युत्तर विभाग,
वसंतराव नाईक महाविद्यालय, वसरणी, नांदेड

संशोधन केंद्र

श्री शिवाजी महाविद्यालय,
कंधार, जि. नांदेड

ऑगस्ट 2023

“डॉ.अनिल कठारे यांचे इतिहास लेखनातील योगदान: एक चिकित्सक अभ्यास”

1. प्रस्तावना :

इतिहास म्हणजे अनुभवांचा नंदादीप होय. हॅपाल्ड यांनी सांगितले, “इतिहास म्हणजे मानव जातीच्या जीवन प्रवाहाचा अभ्यास असेही म्हणता येते.” इतिहासाचे प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक असे कालखंड प्रामुख्याने पडतात. इतिहासाच्या कोणत्याही कालखंडाचा अभ्यास म्हणजे त्या कालखंडाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय, सांस्कृतिक, धार्मिक आदी बाजुंचा अभ्यास असतो. याशिवाय या सर्वांचा एकमेकांशी असलेला संबंध आणि परिणाम यांचा अभ्यास यांचाही अंतर्भाव इतिहासात होतो. इतिहास या विषयाचे आकलन करून घेताना प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाच्या इतर घटकांची आवश्यक किमान माहिती व संस्कृतीचा सखोल अभ्यास असा दृष्टिकोन असावा लागतो.

इतिहास लेखन म्हणजे इतिहासातील उपलब्ध पुराव्यांचे चिकित्सकपूर्वक संशोधन करून भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची मांडणी केली जाते. अशा मांडणी करण्याच्या लेखनपद्धतीला इतिहास लेखन असे म्हणतात आणि इतिहासाची चिकित्सापूर्वक मांडणी करणाऱ्या संशोधकाला इतिहासकार असे म्हणतात. इतिहास लेखनात उपलब्ध ऐतिहासिक माहितीचे संकलन आणि

विश्लेषण करणे यांचा समावेश होतो. आधुनिक इतिहास लेखनाचे जनक म्हणून व्होल्टेअर यास ओळखले जाते हे फ्रेंच तत्त्वज्ञ होते. इतिहास लेखन करताना विविध कालखंडावर विविध क्षेत्र निवडून कला, साम्राज्याचे वर्णन, संस्कृती, सामाजिक, राजकीय परिस्थिती इत्यादींचे वर्णन अशा विविध विषयांवर इतिहासकारांनी लेखन केलेले आहे. त्यातील आधुनिक काळात महाराष्ट्रात डॉ.वि.का.राजवाडे, गो.स.सरदेसाई, वा.सि.बेंद्रे, त्र्यं.शं.शेजवलकर, आर.जी.भांडारकर, खं.चि.मेहेंदळे, जी.बी.मेहेंदळे यांसारखे सुप्रसिद्ध इतिहासकारांनी उच्च दर्जाचे इतिहास लेखन केले आहे. या सोबतच अलिकडच्या काळात महाराष्ट्रात अनेक नामवंत इतिहासकार झाले आहेत. महाराष्ट्रातील इतिहासकारांनी अतिशय वस्तुनिष्ठ असे इतिहास लेखन केले आहे. त्यात डॉ.अ.रा.कुलकर्णी, डॉ.रा.श्री.मोरवंचीकर, डॉ.एन.एन.नगराळे, डॉ.ब्रह्मानंद देशपांडे, डॉ.टी.व्ही.पथी, डॉ.जयसिंगराव पवार, डॉ.विद्यासागर कानोले, डॉ.अरूणचंद्र पाठक, डॉ.सोमनाथ रोडे, डॉ.गो.ब.देगलूरकर, डॉ.अनिल कठारे हे सर्व महाराष्ट्रातील सुपरिचित इतिहासकार आहेत. या सर्वांसारखेच डॉ.अनिल कठारे यांचे उल्लेखनिय दर्जेदार इतिहास लेखन केले आहे. प्रामुख्याने मराठवाड्यातील मागास भागातील असून सुद्धा इतिहासातील विविध प्रवाहात लेखन करणाऱ्या डॉ.अनिल कठारे यांचे इतिहास लेखनातील कार्य अत्यंत मोलाचे ठरलेले आहे. त्यांनी केलेले इतिहास लेखन हा त्याचा पुरावा आहे. विशेष म्हणजे डॉ.अनिल कठारे यांनी केलेले इतिहास लेखन सर्व क्षेत्रांना स्पर्श करून जाते

म्हणून डॉ.अनिल कठारे यांनी सर्वच कालखंडातील इतिहासातील सर्वच घटकांवर लिखाण केले आहे एकंदरीत त्यांनी इतिहासात विपूल लेखन आहे. त्यांचे शहाऐंशी शोधनिबंध विविध नियतकालिकात प्रसिद्ध झाले असून शंभरच्या वर संदर्भग्रंथ महाराष्ट्रातील विविध प्रकाशन संस्थांनी प्रकाशित केले आहेत.

डॉ.अनिल कठारे यांनी आपल्या अध्यापन कार्यासोबत इतिहास संशोधन करून त्याचे लेखन केले. त्याबरोबरच इतिहास विषयाच्या विकासासाठी मराठवाडा इतिहास परिषदेत सक्रीय सहभाग नोंदवून पुढे त्यांची निवड मराठवाडा इतिहास परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाली. मराठवाडा इतिहास परिषदेला राज्यस्तरीय बनविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. तद्वतच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यासक्रम मंडळाचे सदस्य तथा 10 जानेवारी 2012 ते 31 ऑगस्ट 2016 पर्यंत अध्यक्ष होते. अध्यक्ष पदावर असताना इतिहास विषयाच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यांनी विविध इतिहास परिषदांमध्ये शोधनिबंध सादर केले. किंबहुना विविध ऐतिहासिक विषयांवर परिसंवादाचे आयोजन करून राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग नोंदवला. त्यांच्या चार संदर्भ ग्रंथांना महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार प्राप्त झाले. त्यातील “मराठवाड्याचा इतिहास” (इ.स. 1999) या ग्रंथास उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मिती राज्य पुरस्कार सन 1999-2000 चा 25 नोव्हेंबर 2001 महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, महाराष्ट्र शासन मुंबई हा प्राप्त झाला. त्याचबरोबर “शिवकाळ व पेशवाईतील महारांचा इतिहास” (इ.स.2002)

उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मिती राज्य पुरस्कार 2001-2002 या ग्रंथास 25 नोव्हेंबर 2002 रोजी प्राप्त झाला. तसेच "भारतीय कलेचा इतिहास" (इ.स. 2008) या ग्रंथास 18 जानेवारी 2009 रोजी "उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मिती राज्य पुरस्कार 2008" हा प्राप्त झाला आणि "महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास" (इ.स.2010) उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मिती पुरस्कार 2010-2011 हा पुरस्कार 25 नोव्हेंबर 2011 महाराष्ट्र राज्य साहित्य निर्मिती व संस्कृती मंडळ, महाराष्ट्र शासन मुंबई तर्फे देण्यात आला.

डॉ.अनिल कठारे यांना एक इतिहासकार म्हणून भारतीय दलित साहित्य अकादमी दिल्ली या संस्थेकडून "डॉ.बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप सन्मान" हा पुरस्कार सन 2000 आणि सन 2004 या वर्षातील डॉ.सोहनपाल सुमनाक्षर भारतीय दलित साहित्य अकादमीचे राष्ट्रीय अध्यक्ष यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच डॉ.अनिल कठारे यांच्या आंबेडकरी चळवळीतील साहित्यिक आणि वैचारिक योगदानाची दखल घेऊन त्यांना 2010 मध्ये "महाकवी वामनदादा कर्डक साहित्य गौरव पुरस्कार" देण्यात आला. त्याचप्रमाणे "राजर्षी शाहू महाराज राष्ट्रीय सन्मान पुरस्कार दिल्ली 2011" मध्ये सन्मानित करण्यात आले. तसेच बाबु जगजीवनराम कला संस्कृती साहित्य अकादमी नवी दिल्ली 2012, राजर्षी शाहू महाराज राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित, इंटरनॅशनल एज्यूकेशनल अवार्ड 2013, इंटरनॅशनल ह्युमन राईटस् जस्टीस फेडरेशन कोरेगाव, जि.सातारा 2013 मध्ये सन्मानित तसेच धम्मभूषण पुरस्कार

बहुउद्देशीय संस्था वटफळा, ता.नेर यांनी 2013 मध्ये सन्मानित केले. याप्रमाणे वरील पुरस्काराने डॉ.अनिल कठारे यांना सन्मानित करण्यात आले. अशा पद्धतीने आपल्या कर्तृत्त्वाने डॉ.अनिल कठारे महाराष्ट्रातील इतिहासकारामध्ये त्यांना अग्रगण्य स्थान आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील सारोळा (बु.) हे छोटेशे गाव त्यांची जन्मभूमी आहे. त्यांच्या वडिलांचे नाव मुरलीधर कठारे तर आईचे नाव सुशीला कठारे हे होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण जि.प.के.प्रा.शाळा सारोळा (बु.) या शाळेत झाले. त्यांचे माध्यमिक शिक्षण उस्मानाबाद तालुक्यातील उपळे माकडाचे येथील हरिभाऊ घोगरे हायस्कूल मध्ये पूर्ण केले. तसेच उच्च माध्यमिक शिक्षण स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूरचे रामकृष्ण परमहंस महाविद्यालय उस्मानाबाद येथे झाले. पुढील महाविद्यालयीन शिक्षणासाठी औरंगाबाद गाठले. तेथील मिलिंद कला महाविद्यालयात पदवीचे शिक्षण मे 1986 मध्ये घेतले. पदव्यूत्तर शिक्षण इतिहास या विषयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ औरंगाबाद येथे सुवर्णपदक पटकावून केले. त्यानंतर संशोधन कार्य डॉ.एन.एन.नगराळे यांच्या मार्गदर्शनाखाली “शिवकालीन व पेशवाईतील महारांचा इतिहास” या विषयावर संशोधन केले. पुढे कंधार येथील श्री शिवाजी महाविद्यालयात अधिव्याख्याता पदावर रूजु झाले. त्यांचा विवाह रमा हिरामण गायकवाड यांच्याशी झाला. त्यांना पुनम, पुजा व पायल या तीन कन्या आहेत.

डॉ.अनिल कठारे यांनी आपल्या संशोधन मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र मराठवाड्यातील 36 विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आज ते सर्व विद्यार्थी महाराष्ट्रातील नामवंत महाविद्यालयात प्रभावीपणे कार्य करताना दिसून येतात. एकप्रकारे यामधून अनेक विद्यार्थ्यांचे जीवन घडवण्यासाठी आपल्या ज्ञानाचा उपयोग करून घेतला. त्यांच्या जीवनातील अंधकार दूर करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य डॉ.अनिल कठारे यांनी केले. त्याबरोबरच श्री शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रसंगी आर्थिक मदतही केली. त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यासाठी सर्वतोपरी मदत सरांनी केली. ते एक नि:स्वार्थी व्यक्तिमत्त्व होते. एक तत्त्वनिष्ठ प्राध्यापक म्हणून त्यांची महाविद्यालयात ख्याती होती. आपल्या सबंध आयुष्यात जात, धर्म असा भेदभाव त्यांनी कधीच केला नाही. आपल्या कार्याशी प्रामाणिक राहणे, संशोधन हे दर्जेदार व्हावे, त्यातून नवनिर्मिती व्हावी यासाठी डॉ.अनिल कठारे नेहमी आग्रही असत. प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी या सर्वांचे आवडते प्राध्यापक होते. सर्वांना सहकार्य व सकारात्मक वृत्तीचे आचरण त्याचे नेहमी असायचे. त्यांनी नि:स्वार्थ भावनेने सेवा केली. एक इतिहासकार म्हणून त्यांची ओळख संबंध महाराष्ट्रात त्यांनी त्यांच्या दर्जेदार इतिहास लेखनातून निर्माण केली. आज महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थी त्यांच्या संदर्भ ग्रंथाचा उपयोग करतात. त्यातील “आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास” हा संदर्भग्रंथ स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त आहे. महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थी या पुस्तकातील ज्ञानाच्या मदतीने विविध पदावर कार्यरत आहे. अशा पद्धतीने

आपल्या लेखनातून समाजाचा विकास, त्यांचा दर्जा उंचावण्याचे काम अप्रत्यक्षपणे डॉ.अनिल कठारे यांनी केले आहे. आजघडीला महाराष्ट्रात जेवढी ग्रंथालये असतील त्या सर्वच ग्रंथालयात कोणत्याही कानाकोपऱ्यातील डॉ.अनिल कठारे सर यांचे संदर्भग्रंथ आढळतात. तसेच विविध विद्यापीठातील विद्यार्थी त्यांच्या संदर्भग्रंथाचा संदर्भ साहित्य म्हणून उपयोग करतात. म्हणजे हा डॉ.अनिल कठारे यांच्या इतिहास लेखनाचा एक प्रकारे गौरवच आहे. डॉ.अनिल कठारे यांचा स्वभाव हा मृदू असला तरी ते परखडपणे मत मांडत असत. नेहमी सत्य, अहिंसा आणि कार्यनिष्ठा या मूल्यांचा अंगिकार केलेला आढळून येतो. अशा इतिहासकाराचा मृत्यू दि. 27 एप्रिल 2021 रोजी कोरोना या महामारीत झाला व इतिहास विषयातील लेखनाची अपरिमित हानी झाली.

अशा उत्कृष्ट इतिहास लेखक डॉ.अनिल कठारे यांचे इतिहास लेखनात महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यांच्या वैयक्तिक जीवनात त्यांचा प्रवास संघर्षमय राहिला. याचा परिणाम आपल्या इतिहास लेखनाच्या कार्यावर कधीच त्यांनी होऊ दिला नाही. अशा प्रगल्भ इतिहासकाराच्या इतिहास लेखनाचे ऐतिहासिक अवलोकन करण्यासाठी “डॉ.अनिल कठारे यांचे इतिहास लेखनातील योगदान : एक चिकित्सक अभ्यास” या संशोधन विषयाच्या माध्यमातून संशोधक संशोधन करणार आहे.

2. विषय निवडीमागील भूमिका :

महाराष्ट्रातील नामवंत इतिहासकारांच्या यादीतील अग्रगण्य असलेले इतिहासकार डॉ.अनिल कठारे हे आहेत. त्यांनी जागतिक इतिहास, प्राचीन-मध्ययुगीन आणि आधुनिक भारताचा इतिहास, मराठ्यांचा इतिहास, राष्ट्रकुटांचा इतिहास, भारतीय कलेचा इतिहास, अमेरिकेचा इतिहास, मराठवाड्यातील लेणी, हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामातील दलित समाज, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि महात्मा गांधी, शाहू-फुले-लोकहितवादी, महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास, पेशवेकालीन महाराष्ट्र या अशा विविधांगी विषयांवर इतिहास लेखन करून इतिहास लेखनात भरीव कामगिरी केली आहे. त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा वा वस्तुनिष्ठ स्वरूपात त्यांच्या योगदानाचा अभ्यास व्हावा या हेतूने तसेच त्यांच्या संघर्षमय प्रवासाची ओळख व्हावी ह्या हेतूने हा विषय निवडलेला आहे.

3. संशोधन विषयाचे महत्त्व :-

महाराष्ट्रातील नामवंत इतिहासकार डॉ.रा.श्री.मोरवंचीकर, डॉ.जयसिंगराव पवार, डॉ.टी.व्ही.पथी, डॉ.वि.का.राजवाडे यामध्ये डॉ.अनिल कठारे यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांनी अतिशय गरीब, उपेक्षित, दारिद्रयात खितपत पडलेल्या मागास भागातून येऊनसुद्धा आपल्या ज्ञानसाधना, जिद्द, चिकाटी, मेहनत, सृजनशील वृत्ती या गुणांच्या बळावर जीवनातील संघर्षावर यशस्वीपणे मात करून प्राध्यापक ते इतिहासकार हा दैदिप्यमान प्रवास केला.

मराठवाड्यातील इतिहासकारांच्या परंपरेत आपल्या इतिहास लेखनाची भर टाकली.

जीवनात आलेल्या संघर्षामुळे ते कधीच खचले नाहीत तर नव्या उमेदीने संकटांचा सामना करून आपले इतिहास लेखनाचे कार्य अखंड चालू ठेवले. आपल्या 30 वर्षाच्या सेवेत त्यांनी सुमारे 100 दर्जेदार संदर्भ ग्रंथांचे लेखन केले. त्याबरोबर सुमारे 86 शोधनिबंध प्रकाशित केले. आपले आयुष्य इतिहास लेखनासाठी वाहून घेतले. त्यांनी आपले तत्त्वनिष्ठ आचरण ठेवले. आपल्या तत्त्वांशी कधीच तडजोड केली नाही. म्हणून त्यांचे जीवनकार्य व इतिहास लेखनातील कार्य समोर यावे यासाठी हा विषय निवडीला महत्त्व आहे.

4. संशोधनाची उद्दिष्ट्ये :

1. डॉ.अनिल कठारे यांच्या इतिहास लेखनाचा अभ्यास करणे.
2. डॉ.अनिल कठारे यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणे.
3. प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक इतिहास, जागतिक इतिहास, मराठ्यांचा इतिहास, मराठवाड्याचा इतिहास, स्त्रियांचा इतिहास, आंबेडकर चळवळीचा इतिहास आदी लिखाणांवर प्रकाश टाकणे.
4. डॉ.अनिल कठारे यांच्या वेगवेगळ्या क्षेत्रातील कार्यावर प्रकाश टाकणे.
5. डॉ.अनिल कठारे यांच्या पूर्ण ग्रंथ संपदेचा मागोवा घेणे.

5. संशोधनाची गृहितके :-

1. डॉ.अनिल कठारे यांचे इतिहास लेखन विद्यार्थ्यांना सक्षम होण्यासाठी साह्यभूत ठरले आहे.

2. डॉ.अनिल कठारे यांचे लेखन महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठातील विद्यार्थ्यांना संदर्भसाहित्य म्हणून उपयोगी आहे.

3. डॉ.अनिल कठारे यांचे लेखन कार्य आणि भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

4. डॉ.अनिल कठारे यांचे प्राचीन, मध्ययुगीन इतिहासातील लिखाण दर्जेदार असून अनेक विद्यावाचस्पती विद्यार्थ्यांना साह्यभूत ठरले आहेत.

5. डॉ.अनिल कठारे यांचे सर्व संपादीत ग्रंथ स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून उपयुक्त ठरतात.

6. संशोधन पद्धती :-

इतिहास हे एक मानव्यविज्ञान विद्याशाखा असून त्यांच्या अभ्यासासाठी संशोधन पद्धतीचा वापर केला जातो.

1. **ऐतिहासिक संशोधन पद्धती**

2. **प्रत्यक्ष मुलाखत संशोधन पद्धती**

3. **संदर्भ ग्रंथ संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी उपरोक्त सर्वच संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

7. तथ्य संकलन :-

मानव्यविज्ञान विद्याशाखेत तथ्य संकलनाचे प्रमुख दोन प्रकार पडतात –

1. प्राथमिक स्त्रोत :

प्रत्यक्ष मुलाखत, प्रत्यक्ष भेटी यांचा वापर प्रस्तुत संशोधनकार्यात होतो.

2. दुय्यम स्त्रोत :

शोधनिबंध, मासिके, वर्तमानपत्रे, संदर्भ ग्रंथ यांचा समावेश होतो.

प्रस्तुत विषयांचा अभ्यास करताना प्राथमिक व दुय्यम दर्जाच्या साधंनाचा वापर करण्यात येणार आहे.

8. संशोधनाच्या मर्यादा :

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी निवडण्यात आलेला विषय "डॉ.अनिल कठारे यांचे इतिहास लेखनातील योगदान : एक चिकित्सक अभ्यास" हा आहे. या प्रकारचे संशोधन करतांना डॉ.अनिल कठारे यांनी सुमारे 100 संदर्भ ग्रंथ व सुमारे 86 शोध निबंध त्यांची अभ्यासपूर्ण वक्तव्ये, परिसंवादाचे आयोजन व त्यातील

सहभाग प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक कालखंडाचा इतिहास जगाचा इतिहास, विविध चळवळीचा इतिहास, मराठवाडा स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास याप्रमाणे विपूल प्रमाणात लेखन कार्य केल्यामुळे सर्वच ग्रंथांचा मागोवा घेणे ही मर्यादा होते.

9. प्रकरणनिहाय आराखडा :

प्रस्तुत संशोधनात मिळालेल्या माहितीच्या आधारे डॉ.अनिल कठारे यांच्या लेखन कार्याचे अवलोकन करण्यासाठी प्रकरणनिहाय संशोधन आराखडा तयार करण्यात आला आहे. तसेच उद्दिष्टांच्या आधारे शोधप्रबंधाची मांडणी खालीलप्रमाणे केली आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

या प्रकरणात विषयाची ओळख होण्यासाठी संशोधन विषयाची पार्श्वभूमी, उद्दिष्ट्ये, गृहितके, संशोधनाची साधने, संशोधन पद्धती, यांचा समावेश करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : साहित्याचे पुन:र्विलोकन

डॉ.अनिल कठारे यांनी इतिहास विषयातील लिहिलेल्या संदर्भ साहित्याचे सर्व कालखंडातील इतिहास, स्थानिक इतिहास, कलेचा इतिहास इत्यादी संदर्भ साहित्यांचे पुन:र्विलोकन करण्यात येईल.

प्रकरण तिसरे : डॉ.अनिल कठारे यांचे जीवनचरित्र

डॉ. अनिल कठारे यांच्या संघर्षमय जीवनचरित्रावर थोडक्यात ऊहापोह करण्यात येईल.

प्रकरण चौथे : डॉ.अनिल कठारे यांचे इतिहास लेखन : स्वरूप आणि व्याप्ती

डॉ.अनिल कठारे यांनी लिहिलेल्या संदर्भ ग्रंथाचे स्वरूप कशाप्रकारचे आहे व त्यांनी लिहिलेल्या ग्रंथाचे सखोल विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण पाचवे : डॉ.अनिल कठारे यांचे इतिहास लेखनातील योगदान : एक चिकित्सक अभ्यास

डॉ.अनिल कठारे यांचे इतिहास लेखनातील योगदान, त्यांच्या संदर्भ साहित्याची उपयोगिता याचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत प्रकरणात येईल.

प्रकरण सहावे : उपसंहार.

डॉ.अनिल कठारे यांचे इतिहास लेखनातील योगदानाचा चिकित्सकपणे अभ्यास केल्यावर वरील सर्व प्रकरणांचा थोडक्यात उपसंहार मांडून जो निष्कर्ष प्राप्त होईल तो निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणात मांडण्यात येईल.

टीप :-संशोधनाला जसजशी गती येईल तसतसे संशोधन आराखड्यात थोडा-बहूत बदल संभवतो.

संदर्भसूची :-

1. कठारे डॉ.अनिल, “प्राचीन भारत (प्रारंभ ते इ.स.647)”, कल्पना प्रकाशन, नांदेड
2. कठारे डॉ.अनिल, “प्राचीन व मध्ययुगीन भारत”, कल्पना प्रकाशन, नांदेड
3. कठारे डॉ.अनिल, “आधुनिक भारताचा इतिहास 1898 ते 1947”, कल्पना प्रकाशन, नांदेड
4. कठारे डॉ.अनिल, “अमेरिकेचा इतिहास 1776-1900”, कल्पना प्रकाशन, नांदेड
5. कठारे डॉ.अनिल, “मराठवाड्याचा इतिहास, प्रारंभ ते 1960”, कल्पना प्रकाशन, नांदेड
6. कठारे डॉ.अनिल, “बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञान ”, कल्पना प्रकाशन, नांदेड
7. कठारे डॉ.अनिल, “हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाड्यातील दलित समाज”, कल्पना प्रकाशन, नांदेड
8. कठारे डॉ.अनिल, “भारतीय कला व स्थापत्य खंड 1”, कल्पना प्रकाशन, नांदेड
9. कठारे डॉ.अनिल, “राष्ट्रकुटांची राजधानी कंधार”, कल्पना प्रकाशन, नांदेड
10. कठारे डॉ.अनिल यांचे प्रकाशित शोधनिबंध आणि समग्र इतिहास लेखन.

संशोधक
श्री पुरी दत्ता भाऊसाहेब
एम.ए., इतिहास

संशोधन मार्गदर्शक
प्रा. डॉ. संजय भाऊराव गिरे
एम.ए., बी.एड्., एम.फिल., पीएच.डी.
इतिहास विभाग प्रमुख, पदवी व पदव्युत्तर विभाग,
वसंतराव नाईक महाविद्यालय, वसरणी, नांदेड